CMYK

बीड । गुरूवार
२०.२.२०२५
वर्षे : ४ अंक : ३१४
किंमत : ३ रू. पाने : ४

दैनिक
# मराठवाडा पत्र
संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे

marathwadapatra.com dailymarathwadapatra2021@gmail.com RNI : Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post : Reg.No. L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob : 9822152955 पान -१




## जय भवानी, जय शिवाजीच्या जयघोषात...

# जिल्हयात शिवजयंती मोठ्या उत्साहाने साजरी

### रॅली, प्रतिमेचे पुजन, मर्दानी खेळासह विविध सांस्कृतीक कार्यक्रम



**बीड ।** प्रतिनिधी

अखंड हिंदुस्तानचे प्रेरणास्थान, महाराष्ट्राचे भाग्यविधाते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त उभ्या महाराष्ट्रात उत्साह संचारला होता. भगव्या पताका खांद्यावर घेऊन आजचा शिवभक्त जिथंतिथं पहायला मिळत असतानाच 'जय भवानी, जय शिवाजी' च्या जयघोषाने उभा बीड जिल्हा दणाणून गेल्याचे चित्र जिल्हयाच्या वाडी, वस्ती, तांड्यापासून शहराशहरात पहायला मिळत आहे. छत्रपती शिवरायांच्या जन्मभूमीत किल्ले शिवनेरीवर सकाळी विविध सांस्कृतिक कार्यक्रम झाले तर बीडमधील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यासमोर शासकीय पुजा होत महाराजांना वंदन करण्यात आले. या वेळी हजारो शिवभक्तांच्या उपस्थितीत 'जय शिवाजी जय भारत'चा नारा देण्यात आला. तत्पुर्वी विद्यार्थ्यांसह शिवभक्तांनी पदयात्रा काढली होती. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त किल्ले शिवनेरीवर आज राज्य शासनाच्या वतीने सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आले. अवघ्या महाराष्ट्रामध्ये शिवजयंतीचा उत्साह संचारला असून अनेक ठिकाणी व्याख्याने, प्रवचने आणि पोवाड्याच्या कार्यक्रमांची रेलचेल पहायला मिळत आहे. बीड जिल्ह्यात शिवजन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा होत असून गेवराईत महानाट्याचे आयोजन करण्यात आले आहे तर जिल्ह्यातील अन्य शहरातही विविध कार्यक्रम घेण्यात आले. बीडमध्ये सकाळी जिल्हाधिकारी, जिल्हा पोलीस अधिक्षक, आमदार, लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, विविध पक्षांचे जिल्हाप्रमुख, पदाधिकारी यासह हजारो शिवभक्तांच्या उपस्थितीत महाराजांच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले. या वेळी 'जय जिजाऊ जय शिवराय'च्या गगनभेदी नाऱ्यांनी बीड शहर दणाणून गेले. सकाळीच 'जय शिवाजी जय भारत'चा नारा देत पदयात्रा काढण्यात आली. या पदयात्रेमध्ये विद्यार्थी- विद्यार्थिनींनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला होता. अवघे बीड शिवमय झाल्याचे दिसून येत आहे. संध्याकाळी मर्दानी आणि मैदानी खेळासह सांस्कृतीक कार्यक्रम बीडच्या छत्रपती संभाजी महाराज मैदानात आयोजीत करण्यात आले होते.

## अंजली दमानिया यांचे पुन्हा...

# अर्धवट ज्ञान, खोट्या आरोपांचे प्रदर्शन

### धनंजय मुंडे यांच्याकडून अंजली दमानिया यांच्या आरोपांचे खंडन



**मुंबई ।** वृत्तसेवा

अंजली दमानिया यांनी आज पुन्हा एकदा अर्धवट ज्ञानाच्या आधारे खोटे बोलून जीआर काढला वगैरे म्हणून जे आरोप केले आहेत ते संपूर्णपणे चुकीचे असून त्या आपल्या अर्धवट ज्ञानाच्या आधारे खोटे आरोप करत असल्याचा खुलासा धनंजय मुंडे यांनी केला आहे. शासनाच्या कार्य नियमावलीनुसार ( रुल्स ऑफ बिजनेस ) जीआर अर्थात शासन निर्णय निर्गमित करण्यासाठीची एक पद्धत आहे, त्यासाठी प्रक्रिया आखून देण्यात आलेली आहे. विभागातील कक्ष अधिकाऱ्याने त्या प्रकरणाची फाईल सादर केल्यानंतर ती उपसचिव, विभागाचे सचिव, अतिरिक्त मुख्य सचिव यांचे मार्फत मंत्र्यांच्या समोर मान्यतेस्तव येत असते, मंत्र्यांची मान्यता होण्यापूर्वी व झाल्या नंतर सुद्धा अतिरिक्त मुख्य सचिव दर्जाचे आय ए एस अधिकारी स्वतः ती फाईल तपासतात आणि त्या नंतरच तो शासन निर्णय निर्गमित होत असतो. त्यामुळे खोटे बोलून जीआर काढला वगैरे असे म्हणणे म्हणजे निव्वळ हास्यास्पद, मीडिया ट्रायल ▶▶पान २ वर

# म्हणे आता सरकारच आंदोलन करणार

### जरांगे पाटील यांची राज्य सरकारवर टीका

**धाराशिव ।** वृत्तसेवा



राज्यातील दोन मराठा मंत्र्यांना हाताशी धरून राज्य सरकारच आता आंदोलन करणार आहे. सलग बारा दिवस अन्नत्याग आंदोलन केल्यानंतर त्याची दखल घेवून मुख्यमंत्री फडणवीस बैठक लावणार असल्याची माहिती आपल्याला त्याच मराठा समाजाच्या मंत्र्याने दिली असल्याचा गौप्यस्फोट मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी केला. वाह रे सरकारी आंदोलन अन वाह रे तुमचं बेगडी सरकार असे म्हणत जरांगे पाटील यांनी राज्यसरकारवर प्रखर शब्दात टीकाही केली. धाराशिव येथे शिवराज्याभिषेक सोहळा समितीच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराजांच्या जन्मोत्सव सोहळ्याच्या निमित्ताने जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली ▶▶पान २ वर

# लाडकी बहीण योजनेला शासनाचं आणखी बळ मिळणार

**मुंबई ।** वृत्तसेवा

राज्यातील विधानसभा निवडणुकांमध्ये गमेचेंजर ठरलेल्या मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेची निवडणुकांच्या निकालानंतरही तितकीच चर्चा सुरू आहे. विधानसभा निवडणुकांच्या प्रचारासाठी महायुतीमधील सर्वच पक्षाच्या नेत्यांनी लाडकी बहीण योजनेचा फुल्ल प्रचार व प्रसार केला. अर्थात, या योजनेचा फायदा जसा महिलांना झाला तसाच राजकीय पक्षांना निवडणुकांमध्ये झाला. भाजप महायुतीला तब्बल २३७ जागांवर बहुमत मिळाले असून एकहाती सत्ता स्थापन करण्यात यश आलं आहे. त्यामुळे, लाडकी बहीण योजनेचं हे फलित असल्याचं सर्वच नेत्यांनी देखील मान्य केलं आहे. मात्र, सरकार स्थापन झाल्यानंतर आता लाडक्या बहिणींची स्क्रुटीनी होऊन लाभार्थ्यांना वगळण्यात येत आहे. त्यामुळे, लाडकी बहीण काहीही नाराज असतानाच आता, लाडकी बहीण योजनेतील महिलांना राज्य सरकार आणखी बळ देणार असल्याची माहिती आहे. नागपूरमधील लाडकी बहीण योजनेतील महिलांनी क्रेडिट ▶▶पान २ वर



### नवसंकल्पनेतून महिलांना कुठला लाभ मिळणार?

### ५ लाख लाभार्थी महिला कमी

महाराष्ट्र सरकारनं गेल्या काही दिवसांपासून योजनेतील अर्जांची पडताळणीची प्रक्रिया सुरु केली होती. डिसेंबरमध्ये राज्य सरकारनं २ कोटी ४६ लाख महिलांना मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभाचे वाटप केले होते. तर, जानेवारी महिन्यात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा लाभ २ कोटी ४१ लाख महिलांना दिला गेला होता. या योजनेतील ५ लाख लाभार्थी महिला त्या महिन्यात कमी झाल्या. त्यामध्ये काही लाभार्थी महिला संजय गांधी निराधार योजनेचा लाभ घेणाऱ्या होत्या हे समोर आलं होतं. याशिवाय काही महिलांचं वय ६५ वर्ष पूर्ण झाल्यानं त्यांची ▶▶पान २ वर

# मी विरोधकांना जुमानत नाही

### मस्साजोग अन् धनंजय देशमुख यांचा माझ्यावर विश्वास!



**बीड ।** प्रतिनिधी

मंत्री धनंजय मुंडे यांची एकदा नव्हे तर दोनदा भेट घेतल्यामुळे वादात सापडलेले भाजपचे आमदार सुरेश धस यांनी रोखठोक भूमिका घेत विरोधकांवर निशाणा साधला आहे. धनंजय मुंडे यांची भेट घेतल्यावरून माझ्यावर टीका करणारे लोक हे माझे राजकारणातील कायम विरोधक असलेले आहेत. मी त्यांना जुमानत नाही. मस्साजोगच्या ग्रामस्थांनी सरपंच संतोष देशमुख हत्याप्रकरणात माझ्यावर विश्वास असल्याचे सांगितले आहे. धनंजय देशमुख यांचाही माझ्यावर विश्वास असल्याचा दावा सुरेश धस यांनी केला. सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात आक्रमक भूमिका घेत यातील आरोपी आणि त्यांच्या 'आका'च्या विरोधात गेल्या अडीच महिन्यापासून सुरेश धस हे रस्त्यावरची लढाई लढत आहेत. मात्र नुकतीच त्यांनी भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या निवासस्थानी आणि त्यानंतर डोळ्यांचे ऑपेरशन झाल्याचे कारण देत मंत्री धनंजय मुंडे यांची दोनदा भेट घेतली. ही भेट गुप्त असताना ती जाहीरपणे ▶▶पान २ वर

# अखेर मावळ्यांनी गनिमीकाव्याने उभारला छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा



**केज ।** प्रतिनिधी

गेल्या अनेक वर्षांपासून केज शहरातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या चौकात महाराजांचा अश्वारूढ पुतळा उभारण्याची मागणी होती. त्यासाठी नगरपंचायतीच्या वतीने दोन वेळा प्रस्ताव मंजुरीसाठी पाठविला होता. मात्र प्रस्तावास मंजुरी मिळालेली नव्हती. शेवटी मावळ्यांनी गनिमीकाव्याने ▶▶पान २ वर

# वाळू वाहतूक करणारे दोन टेम्पो पकडले

**बीड ।** प्रतिनिधी

अवैध वाळूची तस्करी आणि उत्खननला जिल्हा पोलीस दल आणि महसूल विभागाने बऱ्यापैकी रोख लावल्यानंतर ही जिल्हयाच्या काही ठिकाणी वाळूची वाहतूक चोरट्या मार्गाने सुरु आहे. आष्टी अंतर्गत वाळुंजमध्ये दोन टॅक्टरद्वारे वाळूची वाहतूक होत असल्याची माहिती मिळाल्यानंतर स्थानिक गुन्हे शाखेने दोन्ही वाहनांवर कारवाई करत दोघांना ▶▶पान २ वर

# पारंपारिक शेतीसोबत जोडधंदा

### मेहनतीने फुलवला व्यवसाय, २० गुंठ्यात पैशाचं पीक!

**बीड ।** प्रतिनिधी

सध्याच्या घडीला शेतकरी शेतीला जोडधंदा म्हणून वेगवेगळे व्यवसाय करत आहेत. बीड जिल्ह्यातील दत्ता सोनवणे यांनी पारंपारिक शेतीच्या पलीकडे विचार करत नर्सरी व्यवसाय सुरू केला आणि आर्थिक स्थिरतेकडे यशस्वी वाटचाल केली आहे. अडीच एकर शेती असलेल्या दत्ता सोनवणे यांनी पारंपारिक शेतीसोबत जोडधंदा करण्याचा विचार केला आणि



२० गुंठे जमिनीत नर्सरीची सुरुवात केली. मागील चार वर्षांत त्यांनी आपल्या मेहनतीने आणि चिकाटीने हा व्यवसाय फुलवला आहे. शेती हा निसर्गाच्या कृपेवर अवलंबून असलेला व्यवसाय आहे. त्यामुळे जोखीम कमी करण्यासाठी आणि जास्त उत्पन्न मिळवण्यासाठी दत्ता सोनवणे यांनी नर्सरी व्यवसायाची निवड केली. सुरुवातीला त्यांनी पालेभाज्या, फुलझाडे आणि फळझाडांच्या रोपांवर भर दिला. ▶▶पान २ वर




CMYK

# दोन दादल्यांचे संतान!




गेल्या पाच वर्षांत तब्बल ६० सहकारी बँका निजधामास गेल्याचे वृत्त 'लोकसत्ता'ने मंगळवारी दिले. म्हणजे वर्षाला १२ आणि दर महिन्यास एक असे हे प्रमाण. सहकारी बँका इतक्या जोमाने बंद पडत असतील तर बँकिंग क्षेत्राचे नियामक असलेली रिझर्व्ह बँक आणि सहकारी बँकांचे नियमन करणारे सहकार खाते झोपा काढते किंवा काय हा प्रश्न. या बँकांचे नियमित लेखापरीक्षण रिझर्व्ह बँकेकडून केले जाते आणि सहकार निबंधकांकडे त्यांचे तपशील असतात. मग या लेखापरीक्षणात या बँकांची परिस्थिती किती गंभीर आहे याचा अंदाज या नियामकास येऊ नये? या काही बँकांचे संचालक मंडळ म्हणजे एक-कुटुंबी गोतावळा आहे हे सहकार खात्यास दिसू नये? सहकारी बँकांचे नियंत्रण दुहेरी वा प्रसंगी तिहेरीही असते. स्थानिक राज्य सरकारे, कृषी क्षेत्राशी संबंधित कार्यक्षेत्र असेल तर 'नाबार्ड' आणि या सगळ्यावर रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया. इतके नियामक असूनही जर या सहकारी बँका अशाच तडफडून मरू दिल्या जात असतील तर दोन मुद्दे प्रामुख्याने उपस्थित होतात. एक म्हणजे या बँका चालू ठेवण्याच्या लायकीच्या नाहीत, सबब त्यास सामुदायिक मूठमाती दिली जावी. किंवा या बँकांच्या व्यवस्थापनात दोष नसेल तर मग नियमन आणि नियामक यांच्यात खोट असावी. साथ आल्याप्रमाणे इतक्या सहकारी बँकांवर आचके देण्याची वेळ येत असेल तर राज्यांच्या सहकार खात्याचे सोडा; पण रिझर्व्ह बँकेसही नामानिराळे राहता येणार नाही. तेव्हा या नियामकांच्याच झाडाझडतीची वेळ आली आहे. त्यास ताजे निमित्त आहे ते 'न्यू इंडिया को-ऑपरेटिव्ह' बँकेवर प्रशासक नेमण्याचा निर्णय. या बँकेवर अचानक निर्बंध लादले गेले आणि ठेवीदारांस किमान सहा महिने त्यांचाच पैसा काढता येणार नाही, असे रिझर्व्ह बँकेने जाहीर केले. ही बँक मल्टी-स्टेट होती. म्हणजे आणखीच पंचाईत. कारण नक्की कोणत्या राज्याचे सहकार खाते तिच्याकडे पाहणार हा प्रश्न. त्यामुळे अशा बहुराज्यीय बँकांवर रिझर्व्ह बँकेची अधिक कडवी नजर हवी. याआधी अशी वेळ आलेल्या 'पंजाब अँड महाराष्ट्र को-ऑपरेटिव्ह बँके'चे पुढे काय झाले? तीदेखील अशी बहुराज्यीय होती आणि जवळपास १३० हून अधिक शाखा असलेल्या या बहुराज्यीय बँकेवर २०१९ साली प्रशासक नेमला गेला. आज सहा वर्षांनंतरही त्या बँकेच्या खातेदार आणि ठेवीदारांस स्वत:च्या घामाची कमाई या बँकेकडून सोडवून घेता आलेली नाही. या बँकेच्या खातेदारांवर सुरुवातीस तर फक्त एक हजार रुपयेच काढण्याचे बंधन होते. नंतर ही मर्यादा पाच हजारांपर्यंत, मग दहा, ५० हजार अशी वाढवत नेली गेली. इतकी वर्षे या बँकेत अनेकांचे खाते आहे. पण रिझर्व्ह बँक म्हणते गुंतवणूकदारांची फक्त मुद्दलच परत मिळेल. हा कोणता न्याय? सहकारी बँकांची वारंवार तपासणी करून त्यांना रिझर्व्ह बँक दंड ठोठावत असते. पण ही दंड रक्कम रिझर्व्ह बँकेच्या कमाईचे साधन आहे की काय असा प्रश्न पडतो. नंतर २०२२ साली ही बँक 'युनिटी स्मॉल फायनान्स बँक' या नव्या वित्तसंस्थेत विलीन केली गेली. ही युनिटी आपल्या मूळ ग्राहकांस घसघशीत व्याज देते. पण विलीन झालेल्या 'पंजाब ॲण्ड महाराष्ट्र'च्या ग्राहकांची बोळवण मात्र फक्त मुदलाच्या परतफेडीवर केली जाणार. ही मुद्दल तरी परत मिळते आहे हे नशीब समजा, असा रिझर्व्ह बँकेचा आविर्भाव. म्हणजे मुळात स्वत: नियामक म्हणून झोपा काढायच्या आणि नंतर सामान्य ग्राहकालाच त्याची शिक्षा द्यायची असा हा प्रकार. आपल्या माननीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी मुंबईत असूनही 'न्यू इंडिया'च्या मुद्द्यावर बोलणे टाळले. तथापि गुंतवणूकदार, खातेदार यांच्या विम्याची रक्कम सध्याच्या पाच लाख रुपयांवरून अधिक वाढवण्याचा इरादा त्यांनी व्यक्त केला. ही मर्यादा पूर्वी एक लाख होती. म्हणजे कोणतीही वित्तसंस्था बुडाली तर ग्राहक-ठेवीदारांस किमान लाखभर रुपयांची हमी. तितके तरी पैसे या बुडीत संस्थेच्या ग्राहकांस सरकारकडून मिळणार, असा त्याचा अर्थ. पण त्याचाच दुसरा भाग असा की या ग्राहकाची बुडीत संस्थेतील ठेव भले १० लाख रुपयांची असो. त्याला मिळणार मात्र एक लाख रुपयेच. ही मर्यादा नंतर पाच लाख केली गेली आणि ती अधिक वाढवली जावी अशी टूम असल्याचे अर्थमंत्रीबाई म्हणाल्या. पण तशी ती वाढली तरी 'न्यू इंडिया'च्या पीडित ग्राहकांस त्याचा काही उपयोग नाही. कारण तसा निर्णय पूर्वलक्ष्यी प्रभावाने काही अमलात आणता येणार नाही. ही हमी 'द डिपॉझिट इन्शुरन्स अँड क्रेडिट गॅरंटी कॉर्पोरेशन' या सरकारी यंत्रणेकडून दिली जाते. ग्राहक, ठेवीदार यांना तितकाच काय तो दिलासा. या सरकारी यंत्रणेने सरत्या आर्थिक वर्षात १,४३२ कोटी रु. इतकी रक्कम बुडीत गेलेल्या विविध वित्तसंस्थांच्या ग्राहकांस विम्यापोटी दिली. यातील धक्कादायक बाब म्हणजे ही सर्वच्या सर्व रक्कम ज्यांना दिली गेली ते सर्व ग्राहक हे फक्त सहकारी बँकांचेच आहेत. याचा अर्थ गेल्या वर्षात सहकारी बँका इतक्या प्रमाणात गतप्राण झाल्या की त्यांच्या ठेवीदार, ग्राहकांवर सरकारला हजारो कोटी रु. खर्चावे लागले. हा पैसा कोणाचा? सहकारी संस्थांचे नियामक डुलकी घेत असल्याने ज्यांना फटका बसला त्यांच्यावर इतका खर्च सरकारला करावा लागला. हे एक प्रकारे कर भरणाऱ्या सामान्य नागरिकांचेच नुकसान. सध्या कारवाई करण्यात आलेल्या 'न्यू इंडिया'चे संचालक मंडळ म्हणजे सारा कौटुंबिक मामला होता, असे सांगितले जाते. ही बाब खरी असेल तर ती लक्षात येण्यासाठी बँकेवर प्रशासक नेमण्याची वेळ यावी? ज्यांनी या संचालक मंडळाची दखल घ्यायची ते सहकार खाते या संदर्भात काय करत होते? त्यांना हे वास्तव लक्षात येऊ नये? की लक्षात येऊनही काही अन्य कारणांनी त्यांनी या वास्तवाकडे दुर्लक्ष केले? तसे असेल तर त्याची किंमत सामान्य गुंतवणूकदार, ठेवीदार यांनी का द्यावी? नियामकांचे नियमन कोण करणार? या बँकेच्या शाखा व्यवस्थापनातही गैरव्यवहार झाल्याचा आरोप होतो. काही राजकारण्यांचे भले करण्यासाठी या बँकेच्या शाखा विस्तारल्या/ स्थापल्या गेल्या असा हा आरोप. सहकार खात्याकडून तो तपासला जाण्याची अपेक्षा नको. पण निदान रिझर्व्ह बँकेने तरी याचा तपास करायला हवा की नको? हे प्रश्न पडतात कारण सर्व यंत्रणांस रस दिसून येतो तो फक्त शवविच्छेदनात. या सहकारी संस्था जिवंत असताना त्या कशा काम करतात, त्यांचे काय चुकते, त्यांनी काय करायला हवे इत्यादीत या नियामकांस रस शून्य. पण या सहकारी बँका गतप्राण झाल्या की मात्र या नियामकांत मृत्यूचे कारण शोधण्याची अहमहमिका, असे हे आपले दुर्दैवी वास्तव. यात दुर्लक्षिले जाते ते एक सत्य. ते म्हणजे या बँकांची स्थापना भले सहकाराच्या तत्त्वाने झाली असेल; पण जन्मास आल्यावर या बँका अन्य बँकांप्रमाणेच चालायला हव्यात. सहकार हे मालकी तत्त्व झाले; बँक चालवण्याचे नाही. तेव्हा या बँकांचे उत्तरदायित्व अन्य बँकांप्रमाणे रिझर्व्ह बँकेकडेच हवे. सद्या:स्थितीत ते दोघांकडे असल्याने दोन दादल्यांच्या अपत्याप्रमाणे ना हा जबाबदार, ना तो अशी अवस्था. तीत बदल न झाल्यास उपासमारीने मरण अटळ.

# शिवरामपुरी मठ संस्थान कायमच आमचे ऊर्जास्त्रोत-आ.नमिता मुंदडा

## वरपगाव येथील एक कोटी रुपयांच्या सभामंडपाचे लोकार्पण



केज, (प्रतिनिधी):-वरपगाव येथील शिवरामपुरी मठ संस्थान हे कायमच आमचे श्रद्धास्थान राहिलेले आहे ईथुन मिळणारी ऊर्जा आम्हाला कायमच लोककल्याणकारी कामे करण्यास सतत प्रेरणा देणारी राहिली असल्याचे उदगार आ नमिता मुंदडा यांनी महंत रामकृष्ण महाराज वरपगावकर यांच्या पुण्यस्मरणानिमित्त आयोजित कार्यक्रम व सभामंडपाच्या लोकार्पण कार्यक्रमात काढले. तालुक्यातील वरपगाव येथील शिवरामपुरी मठसंस्थान व येथील महंत कै रामकृष्ण महाराज यांच्यावर श्रद्धा असणारे भाविक लाखोंच्या संख्येने महाराष्ट्रत आहेत याठिकाणी वर्षभर धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल असते या कार्यक्रमांना असंख्य लोकांची उपस्थिती असते पण हे धार्मिक कार्यक्रम होण्यासाठी याठिकाणी सभामंडपच नसल्याने गैरसोय होत होती हि बाब आ नमिता मुंदडा यांच्या लक्षात आल्याने त्यांनी यासाठी विशेष प्रयत्न करत प्रादेशिक पर्यटन विकास निधी अंतर्गत येथे भव्य सभामंडप होण्यासाठी एक कोटींचा निधी मंजूर करून घेतला होता या कामाचे भूमिपूजन सहा महिन्यांपूर्वी होऊन कै रामकृष्ण महाराज यांच्या पुण्यस्मरणानिमित्त होणाऱ्या सप्ताहापर्यंत याचे काम पूर्ण करण्याचा संकल्प त्यांनी बोलून दाखवला होता. त्यानुसार रामकृष्ण महाराजांच्या पुण्यस्मरणानिमित्त आयोजित काल्याच्या कीर्तनावेळी मठाचे महंत हभप भगवान महाराज यांच्या हस्ते या भव्यदिव्य सभामंडपाचे लोकार्पण करण्यात आले यावेळी जेष्ठ नेते नंदकिशोरजी मुंदडा, राजेसाहेब देशमुख, सुनील गलांडे, ऋषिकेश आडसकर, नेताजी शिंदे, शरद इंगळे, भगवान केदार, हनुमंत भोसले, धनंजय देशमुख, महादेव सूर्यवंशी, लिंबराज फरके, सुरज घुले, सुरेश नांदे, शिवाजी पाटील, कदीर कुरेशी, संतोष जाधव व मठ संस्थानच्या विश्वस्तांसह हजारो भक्तांची उपस्थिती होती

# पीएम किसानचा हप्ता लवकरच खात्यावर




दिल्ली, (वृत्तसेवा):-भारत सरकार शेतकऱ्यांसाठी अनेक योजना राबवत असून राज्य सरकारही शेतकऱ्यांना फायदा देणाऱ्या योजना चालवत आहे. केंद्र सरकार शेतकऱ्यांसाठी अशीच एक योजना राबवत असून ज्यातून वर्षाकाठी ६ हजार रूपये थेट शेतक-याच्या खात्यावर दिले जातात. प्रधानमंत्री किसान सम्मान निधि योजनेतून शेतकऱ्यांना हा लाभ दिला जालो आतापर्यंत १८ हप्ते देण्यात आले असून १९ वा हप्त्याची वाट देशातील शेतकरी बघत आहेत. आसा १९ व्या हप्त्याबाबत तारीख समोर आली असून देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी शेतक-यांच्या खात्यावर १९ वा हप्ता जारी करणार आहेत पीएम किसान योजनेंतर्गत १९ व्या हप्त्याची तारिख आला समोर आली असून तो कधी मिळणार असाही सवाल आला अनेकाच्या मनात आला असेल. पण चिंता करण्याची गरज नाही. अधिकृत पोर्टलवर याबद्दलची वेळ देखीन जाहीर करण्यात आली असून १९ वा हप्ता (दि. २४) फेब्रुवारी रोजी दुपारी २ले ३.३० या वेळेल जारी होण्याची शक्यता आहे.

# जरांगे पाटलांनी टायमिंग साधलं!

### शिवजयंती दिवशीच 'छावा' सिनेमाबाबत सरकारकडे केलीमागणी

कळंब, (वृत्तसेवा):- अभिनेता विकी कौशलचा 'छावा' सिनेमाला प्रेक्षकांनी डोक्यावर घेतलं आहे. हा सिनेमा सध्या थिएटरमध्ये धुमाकूळ घालत आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचे पुत्र संभाजी महाराज यांच्या शौर्यावर आधारित असलेला 'छावा' सिनेमा बॉक्स ऑफिसवर चांगली कामगिरी करत आहे. अशातच आता मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी शिवजयंतीच्या दिवशीच या सिनेमाबाबात सरकारकडे मोठी मागणी केली आहे. आज देशभरात छत्रपती शिवाजी महाराजांची ३९५ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी केली जात आहे. याच पार्श्वभूमीवर किल्ले शिवनेरीवर हिंदवी स्वराज्य महोत्सव साजरा करण्यात येत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी देखील या महोत्सवाला हजेरी लावली आहे. तर तिकडे धाराशिव जिल्ह्यात देखील शिवजयंती उत्सव साजरा करण्यात आला. जिल्ह्यातील कळंब येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला अभिवादन करत. भगवा ध्वज फडकावत या उत्सवाची मनोज जरांगे पाटील यांच्या हस्ते सुरुवात करण्यात आली. यावेळी माध्यमांशी बोलताना पाटील यांनी 'छावा' सिनेमाबाबत मोठी मागणी केली. छावा सिनेमा टॅक्स फ्री करावा अशी मागणी जरांगे पाटील यांनी केली. तर यावेळी त्यांनी अभिनेते राहुल सोलापूरकर यांनी शिवाजी महाराजांबाबत केलेल्या वादग्रस्त वक्तव्यावरून सरकारवर मोठा आरोप केला. सोलापूरकर यांनी वादग्रस्त वक्तव्य केलं, मात्र त्यानंतर सरकारच्या आदेशामुळेच त्यांच्यावर कारवाई करण्यात आली नाही, असा आरोप जरांगे पाटील यांनी केला.

पान १ वरून

## अर्धवट ज्ञान, खोट्या आरोपांचे...

करणे आणि आपल्या अर्धवट बुद्धीचे प्रदर्शन करणे असे आहे. अंजली दमानिया यांनी गेल्या पंधरा वर्षात ज्या काही मीडिया ट्रायल रन केल्या, ज्या कोणाविरुद्ध आरोप केले त्यातील एकही आरोप अद्याप कोणत्याही मा न्यायालयात अथवा इतरत्र कोठेही सिद्ध होऊ शकलेला नाही. त्याचेही कारण अर्धवट माहिती हाच असावा. मंत्रिमंडळाचा निर्णय झाला किंवा नाही असे भासवून निर्णय होत नाही, भासवून गोष्टी करण्यासाठी ती अंजली दमानिया यांची प्रेस कॉन्फरन्स आहे का, असा प्रश्नही धनंजय मुंडे यांनी उपस्थित केलाय! एखाद्या विषयास मंत्रिमंडळाच्या बैठकीत चर्चेअंती मान्यता झाल्यानंतर मंत्रिमंडळाच्या बैठकीचे इतिवृत्त हे माननीय मुख्यमंत्री महोदयांनी मान्य केल्यानंतर राज्यातील सर्वोच्च आयएएस अधिकारी असलेल्या माननीय मुख्य सचिव यांच्या स्वाक्षरीने निर्गमित केले जातात. मात्र दमानिया यांनी या प्रक्रियेची माहिती घेतली असती तर असे निराधार आणि धादांत खोटे विधान कदापि केले नसते. ऑफिस ऑफ प्रॉफिट पासून ते काहीही तथ्य नसलेल्या घोटाळ्यांचे कोणते तरी अर्धवट कागद समोर दाखवून त्याला पुरावा म्हणणे आणि मिडिया ट्रायल रन करणे हे अंजली दमानिया यांचा व्यवसाय झालेला आहे, त्यासंदर्भात त्यांच्याकडे कॉंक्रीट कागदपत्रे असल्यास त्यांनी न्यायालयात जावे, आता न्यायालयामध्ये आम्ही देखील त्यांना योग्य तो धडा शिकवू, असेही धनंजय मुंडे म्हणालेत. फर्टीलायझर कंट्रोल ऑर्डर हा केंद्र शासनाचा कायदा आहे, त्यानुसार विशिष्ट प्रमाणपत्र धारण केल्याशिवाय व खत निर्माता कंपनीने प्राधिकृत केल्याशिवाय कोणालाही खतांची विक्री करता येत नाही. यासंदर्भात खत्रज्ञऊज ने संबंधित कंपन्यांना २०२२ व २०२३ मध्ये सुद्धा नोटीस दिलेल्या आहेत. पण आपल्या सोयीचे तेवढे बोलायचे आणि अर्धवट ज्ञान प्रदर्शन करणे हे धोरण फक्त बदनामीसाठी आहे. सदर कंपन्या या आमची उत्पादित खते विकण्यास प्राधिकृत नाहीत, फर्टीलायझर कंट्रोल ऑर्डर मधील तरतुदींप्रमाणे ओ प्रमाणपत्र असल्याशिवाय अशी खते विकता येत नाहीत, अशा प्रकारची प्रेस रिलीज आमचे स्वीय सहाय्यक यांनी नव्हे तर स्वतः इफकोने याआधीच काढलेली आहे, तसेच ती आजही खत्रज्ञऊज चा संकेत स्थळावर उपलब्ध आहे. अंजली दमानिया यांना देखील ही बाब समजत असावी, मात्र तरीही खोटे बोल पण रेटून बोल, असा उद्योग त्यांनी चालवला आहे.

## वाडकी बहीण योजनेला...

कोऑपरेटिव्ह सोसायटी स्थापन केली असून आपली आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी उद्योगाच्या रुपाने नवं पाऊल टाकलं आहे. आता, नागपूरमधील लाडक्या बहिणींच्या या संकल्पनेच्या स्वरुपात राज्यभरातील महिलांना राज्य सरकार मदतीचा हात देणार असल्याची माहिती आहे. नागपूर मधील लाडक्या बहीण योजनेतील ३ हजार महिलांनी एकत्र येऊन ३० लाखांचा केला निधी उभा आहे. प्रत्येक महिलेने १ हजार रुपये जमा करत ३० लाखांचा निधी जमा करत क्रेडीट को-ऑपरेटीव्ह सोसायटी स्थापन केली आहे. या निधीतून महिलांना उद्योगाला हातभार लावला जाणार आहे. त्यामुळे, याप्रमाणे इतर महिलांनी देखील प्रयोग करुन इतर उद्योगधंदे सुरु करण्यासाठी राज्य सरकार मदत करणार असल्याची माहिती आहे. त्यासाठी, राज्य शासनाच्या आर्थिक विकास महामंडळामार्फत महिलांना मदत केली जाणार आहे. नागपूरमधील लाडक्या बहिणीचं हे उदाहरण समोर ठेवून इतर महिलांना मदत करण्याचा सरकारचा मानस आहे. त्यामुळे, आधीच लाडक्या बहिणींना दरमहा १५०० रुपये देऊन आर्थिक लाभ देणाऱ्या सरकारने ही संकल्पना सत्यात उतरवल्यास या महिलांना उद्योग विकासात आणखी मदत होईल. दरम्यान, सरकारकडून लाडक्या बहिणींना २१०० रुपये दरमहा देण्यात येणार आहेत. कारण, यापूर्वी महायुतीने निवडणूकपूर्व जाहीरनाम्यात तशी घोषणाही केली होती. त्यामुळे, लाडक्या बहिणी सध्या २१०० रुपये कधी मिळणार याची वाट पाहत आहेत.

## ५ लाख लाभार्थी

संख्या कमी झाली. याशिवाय अडीच लाखांपेक्षा अधिक उत्पन्न असणाऱ्या किंवा चारचाकी वाहन असलेल्या कुटुंबातील महिला अर्जदारांची नावं कमी करण्यात आली होती.

## मी विरोधकांना जुमानत...

माध्यमांसमोर त्यांच्या पक्षाचे अध्यक्ष असलेल्या चंद्रशेखर बावनकुळे यांनी उघड केली. यानंतर सुरेश धस (डीशीह ऊही) यांच्या भूमिकेवर संशय व्यक्त केला जाऊ लागला. विरोधकांनी धस-मुंडे यांच्यात सेटलमेंट झाल्याचे आरोप केले. मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनीही हा आधुनिक काळातील फितूर असल्याची टीका धस यांच्यावर केली. तिकडे मस्साजोगमध्ये धनंजय देशमुख आणि त्यांच्या कुटुंबियांकडूनही धस-मुंडे भेटीवर चिंता व्यक्त केली गेली. धनंजय देशमुख यांनी माझ्या भावाच्या खूनातील एकही आरोपी सुटला नाही पाहिजे, जर एकही आरोप सुटला तर मग संशयाला जागा निर्माण होऊ शकते, अशी प्रतिक्रिया व्यक्त केली होती. या सगळ्या वातावरणात सुरेश धस यांनी मात्र मस्साजोग येथील ग्रामस्थ आणि सरपंच संतोष देशमुख यांचे बंधु धनंजय देशमुख यांचा या लढ्यात आपल्यावरील विश्वास कायम असल्याचा दावा केला. मी या हत्या प्रकरणात आरोपींना फासावर लटकवण्यासाठी सुरुवातीपासून लढा लढतो आहे. जे माझ्यावर संशय व्यक्त करतात ते राजकारणातील माझे कायमचे विरोधक राहिलेले लोक आहेत. मस्साजोगमधील लोकांचा अजूनही माझ्यावर विश्वास कायम आहे. धनंजय देशमुख यांनाही तुम्ही विचारा, त्यांनी नाही म्हटलं तर मग मला बोला, असे आवाहन देखील सुरेश धस यांनी केले.

## वाळू वाहतूक करणारे...

ताब्यात घेतले. यात १० लाख ३० हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. नवनाथ देविदास शिंदे (रा. वाळुंज) आणि विलास रामदास जोगदंड (रा. टाकळसिंग) असे पकडलेल्या दोन आरोपींचे नावे आहेत. वाळूमाफियांची दादागिरी पोलीस अधिक्षकांनी मोडीत काढल्यानंतर काही माफिया चोरट्या मार्गाने वाळूची वाहतूक करीत आहेत. याबाबत माहिती मिळाल्यानंतर स्थानिक गुन्हे शाखेतील कर्मचाऱ्यांनी कारवाई करत दोन टेम्पो ताब्यात घेतले. यावेळी टेम्पोमध्ये तीन ब्रास वाळू होती. या कारवाईत १० लाख ३० हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून आष्टी पोलीस ठाण्यात दोघांवर ही गुन्हा दाखल करण्यात आला. ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कांवत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, पोलीस निरीक्षक उस्मान शेख यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक श्रीराम खटावकर, पोलीस हवालदार अशोक दुबाले, दिपक खांडेकर, सोमनाथ गायकवाड, बाळू सानप, अर्जुन यादव, सिद्धार्थ मांजरे यांनी केली आहे.

## पारंपारिक शेतीसोबत...

योग्य खतांचे प्रमाण, पाणी व्यवस्थापन आणि चांगल्या प्रतीची रोपे उपलब्ध करून देण्यावर त्यांनी लक्ष केंद्रित केले. त्यांच्या मेहनतीमुळे आज त्यांची नर्सरी शेतकरी आणि बागकामप्रेमींसाठी एक विश्वासार्ह केंद्र बनली आहे. सुरुवातीच्या काळात दत्ता सोनवणे यांना काही अडचणींचा सामना करावा लागला. योग्य बाजारपेठ मिळवणे, रोपांची गुणवत्ता राखणे आणि आर्थिक गुंतवणूक व्यवस्थापन ही मोठी आव्हाने होती. मात्र त्यांनी सातत्याने प्रयत्न करत या सर्व अडथळ्यांवर मात केली. त्यांच्या नर्सरीत आता कोथिंबीर, मिरची, टोमॅटो, वांगी यांसारख्या पालेभाज्यांच्या रोपांसह औषधी वनस्पती आणि शोभेच्या झाडांचीही मागणी वाढली आहे. या व्यवसायामुळे दत्ता सोनवणे यांचे उत्पन्न वाढले असून त्यांनी आपल्या नर्सरीत स्थानिक युवकांना रोजगारही उपलब्ध करून दिला आहे. पारंपरिक शेतीसोबत पूरक व्यवसाय केल्यास शेतकरी आर्थिकदृष्ट्या सक्षम होऊ शकतात हे त्यांनी आपल्या यशाने सिद्ध केले आहे. भविष्यात त्यांचा नर्सरीचा विस्तार करण्याचा मानस आहे आणि ते ऑनलाइन विक्रीचाही विचार करत आहेत. दत्ता सोनवणे यांची यशोगाथा इतर शेतकऱ्यांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. शिक्षणाची कोणतीही पार्श्वभूमी नसतानाही मेहनत, ध्येयधोरण आणि योग्य नियोजन यांच्या जोरावर कुठलाही शेतकरी यशस्वी उद्योजक बनू शकतो हे त्यांनी दाखवून दिले आहे. दत्ता सोनवणे हे शेतकरी नर्सरी या व्यवसायाच्या माध्यमातून वर्षाला कमीत कमी ७ लाखांपर्यंत नफा मिळवतात. कमी जागेत अधिक उत्पन्न मिळवण्याचा त्यांचा प्रयोग यशस्वी ठरला असून तो इतरांसाठी मार्गदर्शक ठरत आहे.

## म्हणे आता सरकारच...

भव्य मोटारसायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी माध्यमांशी बोलताना जरांगे यांनी चौखूर फटकेबाजी करीत राज्य सरकारला खडे बोल सुनावले. मराठा समाजाच्या आरक्षण मागणीला हे सरकार वेगळं वळण देण्याचा प्रयत्न करीत आहे. राज्यातील माराठ समाजातील दोन मंत्र्यांना पुढे करून आंदोलन करण्याचा डाव सरकारने आखला आहे. मात्र त्यातील एका मंत्र्यानेच आपल्याला ही माहिती दिली आहे असे सांगत त्या मंत्र्याचं नाव तेवढं विचारू नका अन्यथा यापुढे आतील गोष्टी आपल्याला कुणीच सांगणार नाही असे म्हणत जरांगे यांनी संबंधित मंत्र्यांचे नाव उघड करणार नसल्याचे सांगितले. पण आपल्यासोबत आणि समाजासोबत गद्दारी केली तर वेळ आल्यावर त्याचे नाव नक्की जाहीर करिन आत्ता त्याचे नाव विचारू नका असेही जरांगे यावेळी म्हणाले. राज्यातील मराठा समाज आरक्षणासाठी थेंब थेंब रक्त जाळत आहे. सगळ्यांना अपेक्षा आहे की आरक्षण मिळायला हवे. मात्र हे सरकार जाणूनबुजून आरक्षण देत नाही.शेतकरी आणि मराठा समाजाचा या सरकारला तिरस्कार आहे. तरीही येत्या मंगळवरपर्यंत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस मराठा समाजाच्या आरक्षणाचा प्रश्न निकाली काढतील याबाबत शंभर टक्के आशा आहे. कारण आमच्या आठपैकी चार मागण्या तातडीने मान्य करू, त्याची लागलीच अंमलबजावणी करू असे सांगितले होते. चार मागण्यांपैकी आम्ही दोन मागण्यांवर आलो. शिंदे समितीला मुदतवाढ दिली मात्र ती अजून काही पळत नाही. त्यासाठी मनुष्यबळ दिले नाही, निधीची तरतूदही नाही आणि अद्याप त्याचे कक्षही स्थापन केले नाहीत. कुणबी प्रमाणपत्र ऑफिसमध्ये पडून आहेत परंतु त्याचे वाटप नाही याचाच अर्थ असा की शिंदे समिती अद्याप काम करीत नाही. तसेच हैद्राबाद गॅझेट, सातारा आणि बॉम्बे गॅझेटही अद्याप लागू केलेले नाही. भ्रष्टाचार करायला, खून करणारांना पाठीशी घालायला सरकारला वेळ आहे मात्र आमच्या मागण्यांचे काय झाले हे सांगायला या सरकारला वेळ नसल्याची टीकाही जरांगे यांनी केली.

## अखेर मावळ्यांनी...

महाराजांच्या जन्मदिनी अश्वारूढ पुतळा उभारला. फटाक्यांची आतिषबाजी करीत शिवप्रेमींनी फोटो काढून आनंदोत्सव साजरा केला. केज शहर हे अहिल्यानगर ते अहमदपूर आणि खामगाव ते पंढरपूर या दोन राष्ट्रीय महामार्गावर येत असून या दोन्ही महामार्गावर शहरात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या नावाने चौक आहे. या चौकात रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांचा अश्वारूढ पुतळा उभारण्याची शिवप्रेमी नागरिकांची मागणी होती. त्यासाठी कायदेशीर मार्गाने पुतळा उभारण्यासाठी लढा सुरू होता. तर नगरपंचायतीच्या वतीने पुतळा उभारण्याच्या मंजुरीसाठीचा दोन वेळा प्रस्ताव तयार करून जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठविला होता. मात्र पुतळा उभारण्यासाठी मंजुरी मिळालेली नव्हती. त्यासाठी मावळ्यांनी पुतळा उभारण्यासाठी पुढाकार घेतला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या जन्मदिनी पुतळा उभारण्याची रात्रीतून तयारी करीत शेवटी गनिमीकाव्याने या चौकात छत्रपती शिवाजी महाराज यांचा अश्वारूढ पुतळा उभारला. त्यानंतर फटक्यांची अतिबाजी करीत आनंदोत्सव साजरा करीत बुधवारी पहाटे शिवप्रेमींना सुखद धक्का दिला. पहाटेपासून शहर आणि तालुक्यातील मावळ्यांनी पुतळा पाहण्यासाठी गर्दी करीत पुतळ्यास अभिवादन करीत फोटो काढले. शहरात छत्रपती शिवाजी महाराज यांचा हा अश्वारूढ पुतळा उभारण्यात आल्याने शिवप्रेमींची स्वप्नपूर्ती झाली आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed, Beed -431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq-Beed Dist-Beed pin -431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि.बीड, -४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता.जि.बीड -४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com,Eportal-https://marathwadapatra.com

# छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याबरोबर सुराज्याची स्थापना केली : राजेभाऊ फड

## राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने शिवजयंती साजरी; पदाधिकारी व कार्यकर्त्यांची उपस्थिती

**परळी । प्रतिनिधी**

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक, कुळवाडी भूषण छत्रपती शिवाजी महाराज यांनी स्वराज्याबरोबर सुराज्याची स्थापना केली. अठरापगड जाती - धर्माच्या प्रजेच्या हिताच्या रक्षणाची त्यांनी विशेष काळजी घेतली. आपल्या राज्यातील जनतेच्या मिरचीच्या देठालाही धक्का लागला नाही पाहिजे असा राजेंचा कटाक्ष होता. म्हणूनच त्यांना सबंध विश्वाचे जाणते राजे अशी पदवी बहाल केली. हेच सुशासन अबाधित राखणे, तोच सलोखा कायम ठेवणे या राज्याचे नागरिक म्हणून आपल्या प्रत्येकाची जबाबदारी असल्याचे प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते राजेभाऊ फड यांनी केले. पक्षाच्या वतीने शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराज चौक येथील संपर्क कार्यालयात शिवप्रतिमेचे



पूजन करण्यात आले तसेच महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याला अभिवादन करण्यात आले.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते राजेभाऊ फड यांच्या नेतृत्वाखाली परळी वैजनाथ शहरात शिवजयंती उत्साहात साजरी करण्यात आली. मुख्य चौकातील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथील महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्यास अभिवादन करण्यात आले. तसेच पक्षाच्या परळी विधानसभा जनसंपर्क



कार्यालयात शिवप्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष बाबासाहेब शिंदे पाटील, ज्येष्ठ नेते उत्तमदादा माने, शहराध्यक्ष ॲड.जीवनराव देशमुख, मुक्ताराम गवळी, महिला आघाडीच्या जिल्हा सरचिटणीस मंगलताई सोळंके, तालुकाध्यक्ष वर्षाताई रायभोळे, शहराध्यक्ष कल्पनाताई देशमुख, शिवाजीराव लोमटे, भगवानराजे कदम, प्रकाश मुंडे, युवा कार्यकर्ते अक्षय सोनवणे यांच्यासह अनेकांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बोलत असताना राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते राजेभाऊ फड यांनी शिवचरित्रावर प्रकाश टाकला. ते बोलत असताना म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराज यांचा इतिहास हा पुढील शेकडो पिढ्यांसाठी प्रेरणादायी आणि आदर्श असा आहे. महाराजांनी उभे केलेले स्वराज्य आणि सुराज्य आजच्या काळात अबाधित राखण्यासाठी सर्वाभिमुख प्रयत्न होणे गरजेचे असल्याचेही प्रतिपादन त्यांनी केले.

# छत्रपती शिवाजी महाराज जयंती डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यालयामध्ये उत्साहात संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर विद्यालयामध्ये हिंदवी स्वराज्य संस्थापक, कुळवाडी भूषण, रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज जयंती कार्यक्रम या विद्यालयाचे मुख्याध्यापक बी.ए.हावळे यांच्या मुख्य उपस्थितीमध्ये उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या प्रारंभी राजमाता जिजाऊ, छत्रपती शिवाजी महाराज आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. शिवजयंती निमित्त



मानसी खंडागळे, प्रणिती शिंदे, प्राची जावळे, संस्कृती साळवे या विद्यार्थिनींनी गीत गायन केले. विद्यार्थ्यांची शालेय परिसरातून प्रभात फेरी काढण्यात आली. याप्रसंगी ऋत्विक ढोकणे, प्रद्युम्न घुले, माऊली मुंडे या विद्यार्थ्यांनी आणि यु.बी. पवळ, संतोष मेश्राम आणि सांस्कृतिक विभाग प्रमुख विजय देशमुख यांनी याप्रसंगी विचार प्रतिपादन केले. याप्रसंगी मुख्याध्यापक बी.ए. हावळे यांनी छत्रपती शिवाजी महाराज सर्वार्थाने आदर्श व बहुआयामी व्यक्तिमत्व होते असे अध्यक्षीय समारोपप्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

# सौ. के.एस.के. उर्फ 'काकू' अन्नतंत्र आणि कृषि महाविद्यालयात शिवजयती उत्साहात साजरी

**बीड । प्रतिनिधी**

येथील सौ. के.एस.के. 'काकू' अन्नतंत्र आणि कृषि महाविद्यालय, बीड येथे राष्ट्रीय सेवा योजने अंतर्गत हिंदवी स्वराज्याचे संस्थापक, जाणता राजा छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या प्रसंगी संस्थेचे सहसचिव डॉ. गोविंद साळुंके यांनी



छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. या वेळी प्राचार्य, सर्व प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## डॉ.भारतभूषण क्षीरसागर साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त बालाघाट हायस्कुल कर्झणी (मोठी) येथे विविध स्पर्धा संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

विनायक युवक कल्याण संस्था संचलित, बालाघाट हायस्कुल कर्झणी (मोठी) ता.जि.बीड येथे संस्थेचे सचिव तथा माजी नगराध्यक्ष भारतभूषण क्षीरसागर साहेब यांच्या वाढदिवसानिमीत्त विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. डॉ.भारतभूषण क्षीरसागर साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त बालाघाट हायस्कुल कर्झणी (मोठी) या शाळेमध्ये निबंध स्पर्धा, वादविवाद स्पर्धा, कथाकथन स्पर्धा, प्रश्नमंजुषा आदी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले.

# पाटांगण गल्लीतील अंगणवाडीत शिवजयंती साजरी

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील पाटांगण गल्ली येथील अंगणवाडी क्रमांक ६१ मध्ये बुधवारी छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या निमित्ताने अंगणवाडीतील चिमुकल्यांनी छत्रपती शिवाजी महाराज व राष्ट्रमाता जिजाऊ यांची वेशभुषा साकारली होती. अंगणवाडीत बुधवारी सेविका शोभा पाटील व मदतनीस रेखा बीडकर यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतीमेचे पुजन करून अभिवादन केले. जयंती कार्यक्रमास अंगणवाडीतील १५ मुले उपस्थीत होती.यावेळी अंगणवाडी सेविका शोभा पाटील यांनी छत्रपती



शिवाजी महाराज यांच्या जीवन कार्यावर मुलांना माहिती दिली.

# शिवजयंती निमित्त १११ मावळ्यांनी केले रक्तदान

## मराठा क्रांती मोर्चा व कर्मयोगी परिवाराच्या शिबिराला उत्स्फुर्त प्रतिसाद

**बीड । प्रतिनिधी**

संपूर्ण महाराष्ट्र आणि देशाचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांचा जन्मोत्सव याही वर्षी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला असून मराठा क्रांती मोर्चा व कर्मयोगी परिवाराच्या वतीने १९ फेब्रुवारी २०२५ रोजी बीड शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक सोळंके पंप परिसर या ठिकाणी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी १११ मावळ्यांनी रक्तदान करून छत्रपती शिवाजी महाराजांना मानाचा मुजरा केला.

दरवर्षी कर्मयोगी परिवाराच्या वतीने बीडमध्ये विविध सामाजिक उपक्रम राबविले जातात. दरवर्षी




शेकडो शिवभक्त रक्तदान शिबिरामध्ये सहभागी होतात. दरम्यान शिवजयंती निमित्ताने छत्रपती शिवाजी महाराज चौकातील सोळंके पंपावर मोठ्या उत्साहात रक्तदान शिबीर पार पडले. यामध्ये सकाळी ९ वाजेपासून मावळ्यांनी उत्स्फुर्तपणे रक्तदान केले. यावेळी तब्बल १११ जणांनी रक्तदान करून चांगला उपक्रम राबविला. सदरील शिबीर पार पाडण्यासाठी कर्मयोगी परिवाराचे सुदर्शन धांडे, सोमनाथ धांडे, नितीन धांडे, नवनाथ प्रभाळे, पृथ्वीराज धांडे, विशाल धांडे, मयुर मस्के, प्रा.देवेंद्र नेवाळे, आनंद काटकर, मळीराम यादव, सुशील वरोडे, जयनाथ धांडे, राजु संगेवार, राज बडे, देविसिंह शिंदे, जगदीश उबाळे, जयदत्त थोटे, संजय गोडसे युवराज मस्के, बापु जाधव आदींनी परिश्रम घेतले.

# केज येथे शिव साम्राज्य शिवजन्मोत्सव आयोजित रक्तदान शिबिरात १०० रक्तदात्यांचे रक्तदान

**केज । प्रतिनिधी**

केर शहरात छत्रपती शिवराय जयंती निमित्त शिव साम्राज्य जन्मोत्सव समितीने मंगळवार रोजी रक्तदान शिबिर आयोजित केले. शिबिरात १०० रक्तदात्यांनी रक्तदान केले. सामाजिक उपक्रमाने केज येथील शिवजन्मोत्सव साजरा होत आहे. शिव साम्राज्य शिवजन्मोत्सवाचे अमोल शिंदे, भैय्या शिंदे, सचिन रोडे, रवी दांगट, विलास आवाड, पपू ढगे, यशवंत रितापूरे, संजय गुंड, मुन्ना धनवडे, सागर डिकूळे, अशोक कदम, सारंग शिंदे, अतुल गुंड दुशांत लांब, अक्षय सत्वधर आदित्य विडेकर, शैलेश भूतकार, राहूल गुंड, अशोक रगडे, संतोष असवले अक्षय कदम, मयूर कदम, तुषार सत्वधर रुद्र जाधव आदी सदस्यांनी शिबिराचे नियोजन केले. रक्तसंकलनासाठी माजलगाव रक्तपेढी डॉ ज्ञानेश्वर गिलबिले, डॉ आर टि जाधवर,डॉ हनुमंत वेताळ, टेक्निशियन मोहन गायकवाड मनीषा हुरडूके, गणेश मेंडके, गणेश नागरगोजे आदींनी सहकार्य केले.



# सह्याद्री प्रतिष्ठाणच्या वतीने शिवजयंती कार्यक्रमास उपस्थित रहा: गायकवाड, झगडे

**माजलगाव । प्रतिनिधी**

येथील सह्याद्री प्रतिष्ठाणच्या वतीने शहरात दि. १९ फेब्रुवारी रोजी शिवजन्मोत्सवाचे आयोजन करण्यात आले असुन छत्रपती शिवाजी महाराज जन्मोत्सव, सकाळी ११.०० वाजता रक्तदान शिबीर तर सायं. ५ वा.छत्रपती शिवाजी महाराज चौकात हँगींग डि. जे. तर प्रथमच अमृतसर पंजाब येथील वीर खालसा ग्रुपचे चित्तथरारक कवायतींचे सादरीकरण हे मुख्य आकर्षण असून याचा लाभ घ्यावा असे आवाहन सह्याद्री प्रतिष्ठाणचे अध्यक्ष नवनाथ गायकवाड, कार्याध्यक्ष दिलीप झगडे यांनी केले आहे.

कार्यक्रमाचे उद्घाटन मा. सभापती जयसिंह सोळंके यांच्या हस्ते तर अध्यक्षस्थांनी भाजपा नेते ज्ञानेश्वर मेंडके तर सभापती जयदत्त नरवडे, संभाजी शेजुळ, शिवाजी रांजवण, चंद्रकांत शेजुळ, रोहन घाडगे, सुशिल सोळंके, नासेर पठाण, खलील पटेल, अच्युत लाटे, राहुल लंगडे, विजय शिंदे, सुशांत पौळ, भागवत भोसले, बाळासाहेब सोळंके, सुशिल डक, सहाय्यक पोलिस अधिक्षक डॉ. बी. धिरजकुमार, उपविभागीय अधिकारी गौरव इंगोले, तहसिलदार संतोष रूईकर, मुख्याधिकारी चंद्रकांत चव्हाण, यांचेसह अनेक मान्यवरांची उपस्थिती असणार आहे.

# जगदंब ग्रुप च्या वतिने नीलकमल हॉटेल येथे छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्साहात साजरी

**बीड । प्रतिनिधी**

जगदंब ग्रुप च्या वतीने हॉटेल नीलकमल येथे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली यावेळी मा. चंद्रकांत शेळके साहेब. तहसीलदार बीड मा. भारत बर्डे साहेब ( पोलिस उप निरीक्षक). मा.अभिमान भालेराव साहेब .( सहाय्यक पोलिस उप निरीक्षक). मा.कृष्णा हुरकुडे( सहाय्यक पोलिस उप निरीक्षक). मा,जयशिग वाघ साहेब( सहाय्यक पोलिस उप निरीक्षक). मा.सुरेश गोरे( पोलिस हवालदार). पोपट गोंडे साहेब मा. दिनेश सेठ मुंदडा बीड जिल्ह्यातील प्रसिद्ध उद्योजक. यांच्या उपस्थितीत महाराजांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करण्यात आला व प्रतिमेचे पूजन करण्यात आले व अल्प उपहार खिचडीचे वाटप करण्यात आले यावेळी श्रद्धा इंटरप्राईजेस चे मालक प्रकाश काळे. बाबा ढवळे यांच्या सह बहुसंख्य शिवप्रेमी व जगदंब ग्रुप ची सर्व टीम भगवान जगताप. बालाजी खोतकर. अजिंक्य



कानतोडे. अशितोष वैद्य, श्रीराम मस्के, सचिन दळवी, विजय शिरसागर, सुरेश गरुड, ज्ञानेश्वर येडे, बाबा गलधर, उपस्थित होते

# सोमेश्वर मंदिर येथे अखंड हरिनाम सप्ताह मोठ्या उत्साहात होणार सुरुवात सर्व भाविक भक्तांनी या सप्ताहाचा लाभ घ्यावा

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील सर्वांच्या नवसाला पावणारे व सर्वांचे इच्छित मनोहर पूर्ण करणारे असे भगवान श्री सोमेश्वर मंदिर या ठिकाणी गेल्या २१ वर्षापासून चालत आलेला हा अखंड हरिनाम सप्ताह या वर्षी या सप्ताहाचे २२ वे वर्ष आहे या २२ व्या वर्षी देखील मोठ्या उत्साहामध्ये आणि आनंदाच्या वातावरणामध्ये श्रीक्षेत्र सोमेश्वर मंदिर बार्शी रोड बीड या ठिकाणी मोठ्या उत्साहात साधू संतांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये येत्या २० जानेवारीला म्हणजेच येत्या गुरुवारी श्री भगवान सोमेश्वराचे पूजन करून या ठिकाणी श्री मंगल कलश स्थापना वेदमंत्राच्या जय घोषात होणार असून ब्रह्म वृद्धांच्या पवित्र वेद मंत्राच्या जय घोषणामध्ये या अखंड हरिनाम सप्ताहाची मोठ्या उत्साहात सुरुवात होणार आहे तरी या सप्ताहामध्ये अनेक महाराष्ट्रातील नामांकित कीर्तनकार आपली कीर्तन सेवा देणार असून या कार्यक्रमांमध्ये प्रवचन कार देखील आपली सेवा करणार आहेत प्रवचन करा पैकी हरिभक्त परायण बाबुराव गोपीनाथ मुंडे महाराज ताडसोन्ना हरिभक्त परायण पांडुरंग महाराज रांजवन महाराज वडगाव हरिभक्त परायण विष्णु महाराज सुरवसे बीड हरिभक्त परायण राम महाराज भोरे हरिभक्त परायण रमेश वायभट महाराज वायभट वाडी हरिभक्त परायण सखाराम महाराज जाधव कोल्हेरवाडी हरिभक्त परायण १०८ विश्व रूप पाक्ष शिवाचार्य महाराज मनमत स्वामी संस्थान मांजरसुंबा हरिभक्त परायण रोहिदास शेळके महाराज वांगीकर हरिभक्त परायण अरुण नाना डाके महाराज काठोडा हरिभक्त परायण सौ गाडेकर ताई महाराज बीड हरिभक्त परायण मोहन महाराज शेळके वांगी हरिभक्त परायण भीमाशंकर तट महाराज बीड हरिभक्त परायण नामदेव महाराज शास्त्री भगवान वाडी तसेच हरिभक्त परायण भागवत महाराज मोठे बीड यांची वरील महाराज मंडळींची प्रवचन सेवा राहील व या सप्ताहामध्ये होणाऱ्या सर्व महाराष्ट्रातील नामांकित हरिभक्त परायण कीर्तनकारापैकी पहिले कीर्तनकार हरिभक्त परायण भाऊसाहेब महाराज बाळकृष्ण जोशी राजा पिंपरीकर गेवराई यांचे प्रथम कीर्तन त्यानंतर हरिभक्त परायण दीपक महाराज मोठे केज यांचे द्वितीय कीर्तन त्यानंतर हरिभक्त परायण विक्रम महाराज काळे श्रीक्षेत्र आळंदीकर यांचे तृतीय दिवशी कीर्तन सेवा त्यानंतर चौथ्या दिवसाची कीर्तन सेवा हरिभक्त परायण लक्ष्मण महाराज मेंगडे निगनुरकर तसेच पाचव्या दिवशीची कीर्तन सेवा हरिभक्त परायण

श्री एकनाथ महाराज पुजारी श्री संस्थान विठ्ठल मंदिर पेठ बीड तसेच सहाव्या दिवशीची कीर्तन सेवा नि शुल्क कीर्तनकार हरिभक्त परायण रांधवे बापू महाराज महाराष्ट्र राज्य पुरस्कार सन्मानित गिनीज बुक नोंद यांचे होईल नंतर सातव्या दिवशीची काल्याच्या कीर्तनाची सेवा श्री हरिभक्त परायण ज्ञानेश्वर माऊली महाराज मंझरीकर यांचे सुश्राव्य उत्कृष्ट कालचे कीर्तन होईल आणि त्यानंतर महाप्रसाद होऊन या महाप्रसादाने मोठ्या उत्साहात या अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता होणार आहे तरी पंचक्रोशीतील सर्व भाविक भक्तांनी व बीड शहरातील सर्व भाविक भक्तांनी या सात दिवसाच्या चालणाऱ्या अखंड हरिनाम सप्ताहामध्ये होणाऱ्या सर्व धार्मिक कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन देव देश आणि धर्म या साठी सातत्याने लोकांच्या सेवेमध्ये आपली सेवा देणारे असे भारतीय जनता पार्टीचे नेते तथा बीड जिल्हा भारतीय जनता पार्टीचे उपाध्यक्ष तथा बीड नगरपरिषद चे सभापती मा श्री नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांनी तसेच त्यांचे सर्व सहकारी पत्रकार व सर्व मित्र आप्तेष्ट यांनी या सात दिवस चालणाऱ्या श्री सोमेश्वर मंदिर येथील अखंड हरिनाम सप्ताहाच्या कार्यक्रमासाठी सर्वांनी भाविक भक्तांनी उपस्थित राहून सर्व धार्मिक कार्यक्रम श्रवण करून आपला उद्धार करून घ्यावा आणि या कार्यक्रमाचा अवश्य लाभ घ्यावा असे आवाहन केले आहे.

**भाजपा नेते नवनाथ अण्णा शिराळे पाटील**



**सर्व बीड शहरातील व पंचक्रोशीतील सर्व भाविक भक्तांनी या अखंड हरिनाम सप्ताह मध्ये चालणाऱ्या सर्व धार्मिक कार्यक्रमासाठी उपस्थित राहून किर्तन श्रवण करून आपले कल्याण करून घ्यावे आणि श्री हरी चे स्मरण करावे आणि आपल्या जिवाचा उद्धार करून घ्यावा.**

# ज्ञान संस्कार गुरूकुल वडवणी येथे शालेय साहित्य वाटप करून शिवजयंती उत्साहात साजरी

**वडवणी ।** प्रतिनिधी

रायगडावरची छत्रपती शिवाजी महाराजांची समाधी क्रांतीसुर्य महात्मा फुलेंनी शोधून काढली या देशात पहिला शिवजयंती उत्सव महात्मा फुले यांनी सुरू केला तर क्रांतीसुर्य महात्मा फुले हे शिवजयंती उत्सवाचे जनक ठरतात शिक्षकांनी शाळेत इतरांनी आपाप आपली कार्यालय बुद्ध विहारी समाज मंदिरे इत्यादी ठिकाणी आणि प्रत्येकाने आपल्या घरात छत्रपती शिवाजी महाराज आणि महात्मा फुले यांच्या प्रतिमा देऊन शिवजयंती साजरी करावी शिक्षकांनी शिवजयंती उत्सवाचा खरा आणि वास्तव इतिहास विद्यार्थ्यांना समजून सांगावा उद्याच्या पिढ्यापर्यंत जर खरा आणि वास्तव इतिहास पोहोचला असेल तर



त्यासाठी आधी आजच्या पिढीला तो समजण्यास अत्यावश्यक आहे छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंती उत्सवाचा खरा इतिहास जतन व्हावा म्हणून कळवा क्रांतीसुर्य महात्मा फुले च्या उत्तुंग कार्य तत्वाला व समृद्धींना उजाळा देण्यासाठी या घराघरात शिवजयंती मनामनात शिवजयंती या देण्याचे महाराष्ट्रभर आयोजन केले आहे. स्वराज्य संस्थापक रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज फाल्गुन मध्ये तृतीया १५५१ म्हणजे १९ फेब्रुवारी १६३० रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांचा जन्म जुन्नर येथील पुणे या ठिकाणी शिवनेरी किल्ल्यावर झाला. वयाच्या १२ व्या वर्षापर्यंत आई जिजाऊ आणि शहाजी राजे यांच्या अध्यक्षतेखाली व नामांक शिक्षकाकडून शिवरायांना कला विद्या व सर्व क्षेत्रात सक्षम केले. पुढे याच थोर शिवरायांनी स्वतःचे स्थान मिळून दिले अशा महापराक्रमी छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती सामाजिक उपक्रम आणि साजरी करावी. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी जय जिजाऊ प्रतिष्ठान संचलित देवगाव ज्ञान संस्कार गुरुकुल मुलांचे निवासी वस्तीगृह वडवणी येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंती निमित्त शालेय विद्यार्थ्यांना साहित्य वाटप करण्यात आलेले आहे. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष गुरुकुल चे संचालक इतापुरे सर राठोड सर ग्रामपंचायत सदस्य ज्ञानेश्वर गवळी प्रा.आशोक खेत्री सर राठोड सर गुरुकुलच्या संचालिका सो अश्विनी ईतापुरे व गवळी लहू इत्यादी या कार्यक्रमाला उपस्थित होते छत्रपती शिवाजी महाराजांच्या यांच्या जीवनावर गुरुकुलच्या विद्यार्थ्यांना भाषणे केले. दरवर्षीप्रमाणे गवळी लहू बाबुराव यांच्यावतीने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्ताने त्यांच्या वतीने गुरुकुलच्या विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आलेले आहे. विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## औषधाविना आरोग्य विषयावर स्वागत तोडकर यांच्या व्याख्यानाचे आयोजन

**बीड ।** प्रतिनिधी



आरोग्यम् धनसंपदा ही संकल्पना सुदृढ आरोग्यासाठी वापरली जाते तरीही आजकालच्या या धकाधकीच्या जीवनात आरोग्याकडे मानवाचे दुर्लक्ष होत आहे, त्यामुळे औषध विना आरोग्य ही संकल्पना आता चर्चेत आली आहे. याचसाठी शिवजयंतीचे औचित्य साधून बीड शहरामध्ये प्रथमच विना औषध आरोग्य या विषयावर स्वागत तोडकर यांचे शुक्रवारी मार्गदर्शनपर कार्यक्रम आयोजित केलेला आहे. बीड जिल्हा युवा सेना व जिजाऊ प्रतिष्ठान बीड यांच्या संयुक्त विद्यमानाने बीड शहरांमध्ये प्रथमच औषध विना आरोग्य या विषयावर निसर्ग उपचार तज्ञ व व्याख्याते स्वागत तोडकर यांचा कार्यक्रम दिनांक २१ फेब्रुवारी रोजी आयोजित केलेला आहे. कार्यक्रम जिजामाता चौक, मोंढा रोड येथे सायंकाळी सात वाजता संपन्न होणार आहे तरी नागरिकांनी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन बीड जिल्हा युवा सेना जिल्हाप्रमुख अजय सुरवसे यांनी केले आहे. सध्याच्या काळामध्ये आरोग्य ही प्राथमिकता झाली आहे तरीही औषधांमुळे जास्तीत जास्त रुग्णांना याचा लाभ होतोच. स्वस्थ आरोग्य ही संकल्पना सध्या खूप चर्चेत आहे त्यामुळे अजय सुरवसे यांनी पुढाकार घेऊन औषध विना आरोग्य आणि निसर्गोपचार याचा प्रचार करण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे.

## शिवजन्मोत्सवनिमित्त शिवरायांच्या शुर शिलेदारांना छायाचित्रांसह फलकाद्वारे मानवंदना

**लिंबागणेश ।** प्रतिनिधी

बीड तालुक्यातील छत्रपती शिवाजी महाराज सार्वजनिक शिवजयंती उत्सव समिती लिंबागणेश यांच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त शुर शिलेदारांना मानवंदना देत इतिहासाच्या पानांवरती माहिती दुर्मिळ असलेल्या कर्तृत्ववान शुरवीर मावळ्यांची व शिलेदारांचा जाज्वल्य इतिहास यावर्षी शिवतीर्थ याठिकाणी फलकाद्वारे लावण्यात आला आहे.या आदर्श उपक्रमामुळे दुर्मिळ ईतिहासाची



माहिती छायाचित्रांसह सर्व सामान्य माणसांपर्यंत पोहोचत आहे.शिवरायांच्या शुरवीर मावळ्यांमध्ये नरवीर सुभेदार तानाजी मालुसरे, वीरबाजी पासलकर, सरनौबत येसाजी कंक, शिवरत्न जिवाजी महाले, गुप्तहेर बहिर्जी नाईक शिव रक्षक संभाजी कावजी स्वराज्याचे पहिले सेनापती बाजी पासलकर वीर योद्धा शेलार मामा निष्ठावंत मावळा सिद्धी हिलाल,अशा शुरवीर शौर्य गाजवलेल्या मावळ्यांची छायाचित्रासह माहिती फलकाद्वारे देण्यात आली आहे.



*बीड: सोमेश्वर इंग्लिश स्कूल धानोर रोड बीड, च्या स्नेहसंमेलन कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून ड.शशिकांत सावंत यांच्या हस्ते उद्घाटन झाले .याप्रसंगी शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर, भाजपा नेते नवनाथ आण्णा शिराळे, संस्थेचे अध्यक्ष भागवत आगाम सर व विद्यार्थी.*

## वैष्णवी महाविद्यालया मध्ये छत्रपती शिवाजी महाराज जयंती साजरी



**वडवणी ।** प्रतिनिधी

साहेबराव मस्के पाटील शिक्षण प्रसारक मंडळ संचलित व डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ संलग्नित वैष्णवी महाविद्यालयामध्ये छत्रपती शिवाजी महाराज जयंती साजरी करण्यात आली. यावेळी प्रथम छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

## युनिक कम्प्युटर आयोजित बेसिक कम्प्युटर एक्झाम यशस्वी ३०० मुलांच्या सहभाग

**बीड ।** प्रतिनिधी

शाडेकरी मुलांमध्ये संगणक विज्ञान याविषयी अधिक रुची आणि आवड निर्माण करण्यासाठी युनिक कम्प्युटर्स यांनी सर सय्यद अहमद खान उर्दू शाळेमध्ये कम्प्युटर क्विझ एक्झाम आयोजित केली होती या एक्झाम मध्ये ३०० शाळेकरी मुलांनी सहभाग घेऊन इनाम साठी आपली दावेदारी मजबूत केली आहे. २६ जानेवारीला मेरिटमध्ये येणारे विद्यार्थ्यांना कॉम्प्युटर,



सायकल, टॅब, स्कूल किट टेनिस किट बॅग आणि वॉच सारखे बक्षीस वितरित करण्यात येणार आहे. युनिक कम्प्युटर चे प्रोप्रायटर शेख रजी यांनी शाळेकरी मुलांमध्ये कॅम्प्युटर शिक्षा घेण्यासाठी प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने हे परीक्षा आयोजित केली होती या परीक्षेला चांगलाच प्रतिसाद मिळाला आणि बीड शहरातील सर्व शाळेतील विद्यार्थ्यांनी सरसोदा अहमद खान उर्दू स्कूल परिसर मध्ये परीक्षा मध्ये सहभाग घेतला २६ तारखेला गुणवंतक मेरिटमध्ये असलेले प्रथम द्वितीय आणि तृतीय बक्षिसे देण्यात येणार आहे

## छत्रपती शिवरायांचे सर्व समभाव विचार घराघरात पोहचवा : डॉ.धीरज कुमार बच्चु

**माजलगाव ।** प्रतिनिधी

छत्रपती शिवाजी महाराज यांनी बारा बलुतेदार आणि अठरा पगड जातींना त्यांच्या स्वराज्यात स्थान देऊन खऱ्या अर्थाने जाती निरपेक्ष, धर्म निरपेक्ष समाज व्यवस्था निर्मान केली होती, हे छत्रपती शिवाजी महाराज यांचे सर्व समभाव विचार घरा घरात पोहचवा असा संदेश बीड सहाय्यक पोअ तथा उपविपोअ,माजलगावाचे



डॉ.बी धीरज कुमार बच्चु यांनी शिवजयंती कार्यक्रमात दिला. माजलगाव पोलीस ठाण्याचे पोनि राहुल सूर्यतळ, पोलीस उपनिरीक्षक आकाश माकणे, संदीप राठोड, दिंडे सह सराफ सुवर्णकार असोसिएशनचे अध्यक्ष रामराजे रांजवण, किराणा असोसिएशनचे अध्यक्ष संजय सोळंके व सर्व पोलीस कर्मचारी,व्यापारी मित्र परिवार, पत्रकार आणि महापुरुष जन्मोत्सव समिती व शहर पोलीस ठाणे माजलगाव यांच्या संयुक्त विद्यमाने शिवजयंती साजरी करण्यात आली.

## मेहनतीने अभ्यास करून वैद्यकीय क्षेत्रात नाव कमवा: संचालक डॉ. आदिती सारडा

**बीड ।** प्रतिनिधी



आदित्य दंत महाविद्यालयात प्रवेश मिळालेले सर्व विद्यार्थी वैद्यकीय क्षेत्रात चांगले करिअर करून रुग्णांची आणि आपल्या देशाची सेवा करणार आहेत. त्यात शंका नाही. मात्र कठोर मेहनत घेऊन अभ्यास केला तर वैद्यकीय क्षेत्रात मोठ नाव कमवता येइल. त्यासाठी प्रत्येकानी कठोर परिश्रम घ्यावेत असे आवाहन आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. आदिती सारडा यांनी केले.

आदित्य दंत महाविद्यालया मध्ये नव्या विद्यार्थ्यांसाठी १७ फेब्रुवारी महाविद्यालयाच्या सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या फ्रेशर्स पार्टी निमित्त विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना डॉ. आदिती सारडा बोलत होत्या. आदित्य शिक्षण संस्थेचे मुखप्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, आदित्य शिक्षण संस्थेचे संचालक डॉ. आदित्य सारडा यांचा मार्गदर्शनाखाली हा कार्यकर्म आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाचे उद्घाटन प्रमुख पाहुणे सी.ए. गिरीश गिल्डा यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने करण्यात आले. या वेळी आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. आदिती सुभाषचंद्र सारडा, आदित्य दंत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हिमांशू श्रीवास्तव, आदित्य कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य शाम भुतडा यांची उपस्थित होते.

## राष्ट्रसंत गाडगे बाबा यांची जयंती सर्व शाळा व कार्यालयात साजरी करावी: मराठवाडा विभागीय युवक अध्यक्ष ॲड. सुधिर जाधव

**बीड ।** प्रतिनिधी

राष्ट्रसंत गाडगे बाबा यांची रविवार दि. २३ फेब्रुवारी २०२५ रोजी १४९ वी जयंती जिल्ह्यातील सर्व शाळा, महाविद्यालय व शासकीय, निमशासकीय कार्यालयात साजरी करण्यात यावी असे आवाहन परीट धोबी समाजसेवा मंडळाचे मराठवाडा विभागीय युवक अध्यक्ष ड. सुधिर जाधव यांनी आवाहन केले.

तसेच संत गाडगेबाबा सार्वजनिक जयंती उत्सव समिती ची कार्यकारणी जाहीर करण्यात आली असून संत गाडगेबाबा जयंती निमित्त नागरिकांनी बहुसंख्येने उपस्थित रहावे, तसेच सकाळी संत गाडगेबाबा पुतळ्यास अभिवादन करण्यात येणार असून त्यानंतर संध्याकाळी ६ वाजता संत



गाडगेबाबा यांची छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यापासून ते संत गाडगेबाबा यांच्या पुतळ्यापर्यंत भव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे त्यात सर्वांनी उत्स्फूर्त सहभाग घ्यावा व त्यांच्या जयंतीनिमित्त संत गाडगेबाबा मठ येथे महाप्रसादाचा कार्यक्रम ठेवलेला असून त्याचा देखील नागरिकांनी लाभ घ्यावा.

राष्ट्रसंत गाडगे बाबा यांनी दीडशे वर्षापूर्वी स्वच्छतेचे महत्व पटवून देवून ते आचरणात आणले होते. आज त्यांच्या विचारांची नितांत गरज आहे. घर स्वच्छ तर परिसर स्वच्छ, गाव स्वच्छ तर देश स्वच्छ हे ब्रिद राष्ट्रसंत गाडगे बाबा यांनी समाजाला पटवून दिले. गाडगे महाराज हे गोरगरीब, दीनदलित यांच्यामधील अज्ञान, अंधश्रद्धा, अस्वच्छता यांचे उच्चाटन करण्यासाठी कार्य करणारे समाजसुधारक होते. तीर्थी धोंडापाणी देव रोकडा सज्जनी । असे सांगत दीन, दुबळे, अनाथ, अपंगांची सेवा करणारे थोर संत म्हणजे गाडगेबाबा. देवळात जाऊ नका, मूर्तिपूजा करू नका, सावकाराचे कर्ज काढू नका, अडाणी राहू नका, पोथी-पुराणे, मंत्र-तंत्र, देवदेवस्की, चमत्कार असल्या गोष्टींवर विश्वास ठेवू नका. अशी शिकवण आयुष्यभर त्यांनी लोकांना दिली. माणसात देव शोधणाऱ्या या संताने लोकांनी दिलेल्या देणग्यांतील पैशांतून रंजल्या-गांजल्या, अनाथ लोकांसाठी महाराष्ट्रात ठिकठिकाणी धर्मशाळा, अनाथालये, आश्रम, व विद्यालये सुरू केली. रंजले-गांजले, दीन-दुबळे, अपंग-अनाथ हेच त्यांचे देव. या देवांतच गाडगेबाबा अधिक रमत असत. त्यांचा महिमा वर्णावा तितका कमीच आहे. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुध्दा स्वतः हातात झाडू घेवून स्वच्छता मोहीम चालू केली आहे. आज प्रत्येक गावात स्वच्छतेचे महत्व पटवून दिले व प्रत्येक गावात स्वच्छता मोहीम चालू आहे.

## श्री नारायण विद्यालयात शिवजयंती उत्साहात साजरी



**बीड ।** प्रतिनिधी

बीड तालुक्यातील आहेर चिंचोली येथील श्री नारायण मा. व उ. मा. विद्यालयात छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली.

श्री नारायण विद्यालयाचे संस्थापक अध्यक्ष श्री महादेवराव काळे (अण्णा), संस्थेचे सचिव तथा प्राचार्य श्री अमोल काळे सर उपस्थित होते. श्री महादेवराव काळे अण्णा यांनी श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला हार घालून अभिवादन केले. प्राचार्य अमोल काळे सर यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवन कार्याविषयी माहिती दिली. सूत्रसंचालन भीमराव रकटे सर यांनी केले तर प्रास्ताविक प्रा.अशोक घरत सर यांनी केले आभार प्रदर्शन प्रा.गणेश मस्के सर यांनी मानले. कार्यक्रमाला श्री पौळ डी.बी, श्री चौधरी पी. बी, श्री रकटे एन. पी ,सौ. भुतावळे बि. आर , करपे सर, चव्हाण सर ,कदम एस .व्ही, पवार पी .एल, शेख सर ,मुरमुडे ए .एन , तसेच विद्यार्थी, शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महाशिवरात्री निमित्त कुर्ला येथील महादेव मळी संस्थानावर आजपासून अखंड हरिनाम सप्ताह

**बीड ।** प्रतिनिधी

बीड तालुक्यातील कुर्ला येथील महादेव मळी संगमेश्वर संस्थानावर महाशीवरात्री निमित्त आज गुरूवार २० फेब्रुवारी २०२५ पासुन अखंड हरिनाम सप्ताहास सुरूवात होत आहे. सकाळी ९ वाजता कुर्ला येथील हनुमान मंदिरावर मिरवणूकीनंतर फुले टाकली जाणार आहे.



येत्या बुधवार २६ फेब्रुवारी रोजी वाराणसी येथील पद्मश्री गणेश्वरशास्त्री द्राविड गुरुजी हे उपस्थीत राहणार आहेत. कुर्ला येथील संगमेश्वर संस्थान महादेव मळी येथे भगवान बाबा टाकळगांवकर यांच्या अधिपत्याखाली व बबन महाराज मस्के यांच्या हस्ते आज गुरूवार २० फेब्रुवारी २०२५ पासुन अखंड हरिनाम सप्ताहास सुरूवात होत आहे. येत्या गुरूवार २७ फेब्रुवारी पर्यंत हा सप्ताह चालणार आहे..



*बीड: डॉ.भीमराव पिंगळे विद्यालयात छत्रपती शिवाजी महाराज जयंती साजरी करतांना शाळेचे मुख्याध्यापक रोहिदास डोंगरदिवे, शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद.*

